महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/९५८ /२०२४ दि. ०३/०९/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, विठ्ठलवाडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. तसेच दि. १६/०९/२०२४ रोजी **'ईद–ए–मिलाद'** सणानिमित्त मोठी मिरवणूक काढण्यात येणार आहे. सदर कालावधीत नमूद विसर्जन मार्गावर व मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला** महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) श्रीराम चौक – ओ.टी. सेक्शन चौक – मेन मार्केट – व्हिनस चौक – नेताजी चौक – भाटिया चौक – ३९ सेक्शन – गााऊन मार्केट – दूधनाका – मठ मंदिर चौक या मुख्य विसर्जन मार्गावरील वाहतूक तसेच रहदारी ही गणपती विसर्जन मिरवणूक पुढील चौकात जाईपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना **श्रीराम चौक, पेट्रोल पंप** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** अ) श्रीराम चौक कडून ओ.टी. सेक्शन कडे जाणारी वाहने पेट्रोल पंप येथून व्हि.टी.सी. रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.
ब) ओ.टी. सेक्शन कडून मेन बाजार कडे जाणारी वाहने उल्हासनगर स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.
क) नेताजी चौक कडून व्हिनस चौक कडे जाणारी वाहने लालचक्की चौक व माणेरेगाव रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.
ड) कैलास कॉलनी कडून भाटिया चौक व नेताजी चौक कडे जाणारी वाहने संभाजी चौक व उल्हासनगर स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.
क) दूधनाका कडून गाऊन मार्केट कडे जाणारी वाहने ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर नं. ५ मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) श्रीराम चौक – ओ.टी. सेक्शन चौक – मेन मार्केट – व्हिनस चौक – नेताजी चौक – भाटिया चौक – ३९ सेक्शन – गााऊन मार्केट – दूधनाका – मठ मंदिर चौक या मुख्य विसर्जन मार्गावरील वाहतूक तसेच रहदारी ही गणपती विसर्जन मिरवणूक पुढील चौकात जाईपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना दि. १७/०९/२०२४ रोजी दुपारी १४:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पार्किंग मुभा –** श्रीराम चौक – ओ.टी. सेक्शन चौक – मेन मार्केट – व्हिनस चौक – नेताजी चौक – भाटिया चौक – ३९ सेक्शन – गााऊन मार्केट – दूधनाका – मठ मंदिर चौक या मुख्य विसर्जन मार्गव्यतिरिक्त इतर पर्यायी मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना **'पार्किंग मुभा'** देण्यात येत आहे.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ०८/०९/२०२४ रोजी (दीड दिवसाचे), दि. ११/०९/२०२४ रोजी (पाच दिवसाचे), दि. १२/०९/२०२४ (गौरी व गणपती), दि. १३/०९/२०२४ रोजी (सात दिवसाचे) व दि. १७/०९/२०२४ रोजी (अनंत चतुर्थी) या कालावधीत दुपारी १२.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील. तसेच दि. १६/०९/२०२४ रोजी सकाळी ०९:०० वा. ते मिरवणूक संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका

**प्रत कार्यवाहीसाठी :-**
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ व ४ व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/- सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :- समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/- सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत कार्यवाहीसाठी :-**
सपोआ उल्हासनगर वाहतूक विभाग व कल्याण, पोनि. उल्हासनगर, विठठलवाडी, कल्याण वाहतुक उपविभाग, ठाणे शहर
२/- उल्हासनगर म.न.पा. संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner